**22 ते 28 सप्टेंबर 2024**

## यूनेस्को प्रमाणित वर्ल्ड हेरिटेज साईट
### जगातील सर्वात मोठे मंदिर... जगातील आठवे आश्चर्य

# अंगकोरवाट विष्णूधाम कंबोडिया हेरिटेज टूर



- सोबत वास्तू, वारसा, इतिहास, भारतीय ज्ञानपरंपरा तज्ञ
- अंगकोरवाट विष्णुधाम • बयॉन • अंगकोर थॉम
- बांटीश्री त्रिभुवन महेश्वर • ता प्रोम • निक पिॲान
- टोनले सॅप • कबाल स्पिआन • सहस्रलिंग
- बांटी कडाई • अप्सरा नृत्य

**ऑनलाईन नोंदणी करा**

**www.angkorbharat.org/cambodia22sept24**

सविस्तर माहिती व्हॉटसअपद्वारे मागविण्यासाठी 8421771262 यावर " अंगकोरवाट " असा व्हॉटसअप संदेश पाठवा.


**अंगकोर भारत फाउंडेशन** द्वारा विश्व मंदिर परिषद

622, जानकी रघुनाथ, पुलाचीवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे, महाराष्ट्र - 04

मोबाईल : 8149471691 व्हॉट्सअप : 8421771262

कंबोडिया हा जगातील एकमेव देश आहे की ज्याच्या राष्ट्रध्वजावर हिंदू मंदिर आहे आणि रियाल या चलनावर हिंदू मंदिराची प्रतिमा छापली आहे. कंबोडियाची अर्थव्यवस्था आज हिंदू मंदिरे आणि त्यांच्यापासून विकसित झालेल्या पर्यटन संस्कृतीवर अवलंबून आहे. कंबोडिया हा आजचा थायलंड आणि व्हिएतनाम यांच्यामध्ये असलेला देश आहे. एका बाजूला कंबोडिया समुद्राने वेढलेला आहे आणि दुसऱ्या बाजूला लाओस, व्हिएतनाम आणि थायलंड या देशांच्या सीमा लागून आहेत. इसवी सनाच्या पहिल्या शतकात (सुमारे इ. स. 65) कौडिण्य नावाचा तरुण आणि साहसी खलाशी 14-15 जहाजांच्या ताफ्यासह दक्षिण भारतातून कंबोडियाला जाणारा पहिला भारतीय होता. त्याने तेथे सोमा नावाच्या नागा राजकन्येशी विवाह केला आणि मेकाँग नदीच्या खोऱ्यात फुनान नावाचे हिंदू राज्य स्थापन केले. फुनान, चेन-ला आणि ख्मेर राजवंशांनी प्राचीन कंबुज देशावर राज्य केले. भारताप्रमाणे कंबोडियातही मंदिरे बांधली गेली. भारतातील पंडित, विद्वान आणि वास्तुविशारद नियमितपणे कंबोडियाला भेट देत असत आणि त्यांच्यामध्ये वास्तुकला, साहित्य, ज्ञान, परंपरा यांची परस्पर देवाणघेवाण होत असे. कंबोडियन मंदिर वास्तुकला दक्षिण भारतीय मंदिर स्थापत्यशास्त्राने प्रभावित झालेली आहे. महामेरूच्या संकल्पनेनुसार मेरू पर्वताप्रमाणे संपूर्ण मंदिर उभारण्याचेही प्रयोग झाले. भारत आणि कंबोडियामधील अंतर अंदाजे ५,००० किमी आहे. भारतातून कंबोडियाला जाण्यासाठी बँकॉक, थायलंडमार्गे जावे लागते. सिंगापूर, मलेशिया येथूनही जाता येते. मुंबईहून साधारणपणे पाच ते साडेपाच तासांची फ्लाइट असते. नोम पेन्ह ही कंबोडियाची राजधानी आहे परंतु सियाम रिप हे शहर मंदिरे, वास्तुकला आणि पर्यटनासाठी सीएम रीप दरम्यान मध्यवर्ती आहे. जून 2024 पासून भारतातून दिल्ली ते नॉम पेन्ह अशी थेट विमान सेवा सुरू होत आहे. ऑगस्ट 2024 दरम्यान मुंबई आणि बंगळुरू येथून सियाम रिप थेट विमान सेवा सुरू होण्याची शक्यता आहे.



**अंगकोरवाट विष्णुधाम:** जगातील सर्वात मोठे मंदिर श्री विष्णू मंदिर उपासनेचे ठिकाण श्री विष्णू मंदिर : अंगकोरवाट मंदिर हे युनेस्कोने जाहिर केलेले जागतिक वारसा स्थळ असून, ख्मेर साम्राज्याचे अलौकिक रत्न आणि जगातील सर्व धर्मांतील सर्वात मोठे धार्मिक स्थळ म्हणून जगप्रसिद्ध आहे. 'भव्य आणि विशाल' हे शब्द संकल्पना, रचना आणि स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने अपुरे आहेत, हे इतके अप्रतिम आणि विलक्षण मंदिर आहे. हे मंदिर ख्मेर राजा सूर्यवर्मन दुसरा ( इ. स. 1113-1150 AD ) याने बांधले होते. मंदिराच्या सभोवती आजूबाजूला मोठे खंदक असून त्यावर दगडी पूल बांधलेले आहेत. हे मंदिर 510 एकर परिसरात बांधले आहे. मंदिराच्या वाटेवर प्रत्येक थांब्यावर तटबंदी आहेत. येथील आठ भुजा असलेली विष्णू मूर्ती सुमारे 15 फूट उंच आहे. मंदिराच्या आतील भिंती दगडी भित्तीचित्रांनी मढवलेल्या आहेत. या तटबंदीने संपूर्ण मंदिर व्यापले आहे. ही तटबंदी एकमेकांच्या वरती आहेत. त्याची रचना एका पिरॅमिडसारखी आहे ज्यामध्ये 5 शिखरे आकाशात उंच आहेत. मुख्य मंदिर 220 फूट उंच आहे. या मंदिरात 10 फूट उंच आणि 300 फूट लांबीच्या 8 मूर्ती आहेत. जेव्हा हे मंदिर पूर्ण झाले आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये लोक वसती करून राहू लागले तेव्हा लंडनची लोकसंख्या ३,००० होती आणि अंगकोरवाटची लोकसंख्या १०,००,००० होती...



## अंगकोर थॉम और बयोन

अंगकोर थॉम ही ख्मेर सम्राट जयवर्मन (7वी) याची राजधानी होती. सुमारे 9 चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या या राजधानीत राजाने विविध मंदिरे बांधली. संपूर्ण अंगकोर थॉम परिसर दगडी भिंतींनी वेढलेला आहे. आजूबाजूला खंदक खोदण्यात आले असून ते खंदक पार करून जाण्यासाठी दगडी पूल बांधण्यात आले आहेत. या पुलाच्या खडकावर समुद्रमंथनाचे प्रतीक असलेले नाग आणि देव आणि दानवांच्या मोठ्या आकाराच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. प्रवेशद्वाराजवळील शिखरावर सर्व बाजूंनी मानवी चेहरे दिसतात. या भागात बायॉन नावाचे भव्य मंदिर बांधण्यात आले आहे. हे खूप विलक्षण आणि अद्भुत रचना असलेले मंदिर प्रत्येकाने पाहणे आवश्यक आहे. मुख्य मंदिराच्या शिखराभोवती 50 पेक्षा जास्त मिनार बांधलेले आणि प्रत्येक मिनारच्या शीर्षस्थानी चार दिशांना लोकेश्वर बोधिसत्वाचे मुखवटे कोरलेले आहेत . सध्या 37 मिनार शिल्लक आहेत. ही वास्तू अतिशय आकर्षक आहे. मंदिराचे शिखर आणि त्यावर कोरलेले अशा प्रकारचे मानवी चेहरे जगात कोठेही आढळत नाहीत.

## बांटी श्री अर्थात त्रिभुवन महेश्वर मंदिर:



ख्मेर घराण्यातील राजेंद्र वर्मा दुसरा (इ.स. 944-968) यांनी 10 व्या शतकात राज्य केले. बांटी श्री मंदिर त्यांच्या काळात बांधले गेले. बांटी श्री हे दगडी कोरीव कामाच्या दृष्टीने सर्वात अनोखे मंदिर आहे. हे काम इतकं बारीक आणि सुंदर आहे की ते लाकडावर कोरल्यासारखं वाटतं. त्या मंदिरातील एका शिलालेखात असे म्हटले आहे की या कामासाठी भारतातून कुशल शिल्पकारांना बोलावण्यात आले होते. या मंदिरात खांडववन दहन, कंसवध हिरण्यकश्यपू वध, कैलाशतोलन, कामदेव दहन, तारा विलाप अशी अतिशय सुरेख शिल्पे कोरलेली आहेत.



### कबाल स्पियन - सहस्र लिंग

हे ठिकाण सिएम रिपपासून 40 किमी अंतरावर आहे. सियाम रिप नदी या पर्वतातून उगम पावून सियाम रिप शहराकडे जाते. तिच्या पात्रामध्ये हजारो शिवलिंगे कोरलेली आहेत. या नदीचे एक नाव सहस्त्रलिंगा नदी असेही आहे. कारण येथे शेकडो शिवलिंगे पाण्यात खोदलेली आहेत. या शिवलिंगासोबतच एका खडकावर ब्रह्मदेवाची मूर्तीही कोरलेली आहे. इथे पाहण्यासारखे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भगवान विष्णूची प्रतिमा. ज्या खडकावरून ही नदी वाहते त्या खडकावर शेषशायी विष्णूची अप्रतिम प्रतिमा कोरलेली आहे.

**ता प्रोम आणि प्री खा वृक्ष मंदिर :** राजा जयवर्मन ( ७वा ) यांने बांधलेली ही अद्भुत मंदिरे आहेत. येथे प्रज्ञा परामिता देवीचे मंदिर असल्याचे मानले जाते. ही बाराव्या शतकाच्या आसपास बांधलेली मंदिरे आहेत. अंगकोर साम्राज्याचा संपूर्ण परिसर जवळपास ४०० वर्षे पूर्णपणे दुर्लक्षित राहिला. ऑरी माऊ नावाचा फ्रेंच पुरातत्वशास्त्रज्ञ काही वनस्पतींच्या शोधात तेथे आला आणि त्याला मंदिराचे अवशेष सापडले. त्यांनी स्थानिक लोकांच्या मदतीने साफसफाई केली आणि त्याने एकामागून एक झाडांच्या दाटीतून मंदिर बाहेर काढले. हे मंदिर सुमारे 400 वर्षे झाडांच्या मुळांनी वेढलेले होते. आजूबाजूची झाडे तोडली तर मंदिरेही नष्ट होतील. त्यामुळे ती झाडे अबाधित ठेवून या मंदिरांना आहे त्या स्थितिमध्ये ठेवण्यात आले आहे. कंबोडिया सरकारने पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी याला ट्री टेंपल असे नाव दिले आहे. ता प्रोम मंदिरांना भेट देताना कधी झाडाच्या खोडातून तर कधी त्याच्या फांद्यांमधून आपल्याला जावे लागते, हा एक विलक्षण अनुभव असतो.



## अप्सरा नृत्य





अप्सरा कंबोडियाच्या राष्ट्रीय अभिमान आणि संस्कृतीचे आभूषण आहेत. अंगकोरवाट मंदिरातही दोन हजारांहून अधिक अप्सरा आणि देवता कोरलेल्या आहेत. अप्सरा हा प्रत्येक मंदिराचा आणि स्थापत्याचा अविभाज्य भाग आहे. अप्सरा नृत्य हा नृत्य नाटकाचा एक लोकप्रिय प्रकार तेथे सादर केला जातो. त्यामध्ये त्या अप्सरांचा योग्य वापर केला जातो. अप्सरा नृत्य नाटक मोठ्या हॉल / प्रेक्षागृहात रंगमंचावर सादर केले जाते. त्यात स्थानिक शास्त्रीय संगीतकारांचा समूह असतो. सर्व प्रथम विविध वाद्ये वाजवतात. त्यानंतर विविध अप्सरा रंगमंचावर जणूकाही आकाशातून प्रकट होतात. आणि त्यांच्या आकर्षक मुद्रा - अभिनयाने आणि लालित्य पूर्ण पद्धतीने नृत्य सादर करतात. स्टेजसमोर बसून आपण एका अद्भुत आनंदाची लयलूट करतो.



## टोनले सॅप (फ्लोटिंग व्हिलेज) नो मॅन्स लँड

टोनले सॅप ही एक मोठी नदी आहे जिचा विस्तार समुद्रासारखा आहे. अनेक मैल पसरलेल्या या नदीत बारमाही पाणी आहे. याला गंमतीने गोड्या पाण्याचा समुद्र असेही म्हणतात. या नदीवरच एक तरंगते गाव वसले आहे. हे जगातील महान आश्चर्यापैकी एक आहे. अमेरिकाआणि व्हिएतनाम यादवी युद्धादरम्यान अनेक व्हिएतनामी नागरिकांनी आपला जीव वाचवण्यासाठी देश सोडून पळ काढावा लागला. त्यांनी जवळच्या देशांमध्ये आश्रय घेतला. यातील अनेकजण होड्या व छोट्या बोटीतून टोनले सॅप येथे आले. त्यांनी कंबोडियात आश्रय घेण्याचा प्रयत्न केला. मात्र स्थानिक पोलिसांनी त्यांना अटक केली. अखेर ते टोनले सॅप नदीत शिरले. त्यांनी तिथे आश्रय घेतला आणि स्थायिक झाले. त्याच्याकडे रहिवासी पुरावा नाही. म्हणूनच त्यांना नो मॅन्स लँड सिटिझन म्हटले जाते.


**सोबत वास्तू, वारसा, इतिहास, भारतीय ज्ञानपरंपरा तज्ञ**



**प्रा. क्षितिज पाटुकले**
संस्थापक - भीष्म स्कूल ऑफ
इंडियन नॉलेज सिस्टीम



**श्री. अभिजीत जोग**
प्रख्यात लेखक
(असत्यमेव जयते...?)



**डॉ. उज्ज्वला पळसुले**
Conservation Arcitect
PhD (Angkor Architecture)

## प्रवासाचा कार्यक्रम : 5 रात्री 6 दिवस

**भारतातून येणाऱ्यांसाठी**

| | तारीख | ठिकाण |
|---|---|---|
| 1 | 22 सप्टेंबर | मुंबई/भारतातील इतर ठिकाणांहून प्रस्थान |
| 2 | 23 सप्टेंबर | सियाम रिप मध्ये आगमन |
| 3 | 24 सप्टेंबर | सियाम रिप |
| 4 | 25 सप्टेंबर | सियाम रिप |
| 5 | 26 सप्टेंबर | सियाम रिप |
| 6 | 27 सप्टेंबर | सियाम रिप |
| 7 | 28 सप्टेंबर | सियाम रिपहून प्रस्थान |
| 8 | 29 सप्टेंबर | भारतात आगमन |

**परदेशातून येणाऱ्यांसाठी**

| | तारीख | ठिकाण |
|---|---|---|
| | | |
| 1 | 23 सप्टेंबर | सियाम रिप मध्ये आगमन |
| 2 | 24 सप्टेंबर | सियाम रिप |
| 3 | 25 सप्टेंबर | सियाम रिप |
| 4 | 26 सप्टेंबर | सियाम रिप |
| 5 | 27 सप्टेंबर | सियाम रिप |
| 6 | 28 सप्टेंबर | सियाम रिपहून प्रस्थान |

- **दिवस 1 (23 सप्टेंबर) कंबोडिया आगमन राष्ट्रीय संग्रहालय, अप्सरा नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम**

  दुपारी 12 च्या आधी सियाम रिप विमानतळावर आगमन, व्हिसा प्रक्रिया, 1 तासांचा ड्राईव्ह, हॉटेलमध्ये चेक इन करणे, भोजन, राष्ट्रीय संग्रहालय भेट, अप्सरा नृत्य, परस्पर परिचय, स्वागत, जेवण, हॉटेलमध्ये विश्रांती.

- **दिवस 2 (24 सप्टेंबर) अंगकोर थॉम, बायॉन, एलिफंट टेरेस, लेपर्ड किंग टेरेस, ता प्रोम, निक पियान**

  सकाळी हॉटेलमध्ये नाश्ता केल्यानंतर, सकाळी 9 वाजता अंगकोर थॉम मंदिराकडे प्रयाण. 6:00 PM हॉटेलवर परत, 6:3 PM अंगकोरवाट आणि भारतीय ज्ञानपरंपरा कथा, व्याख्यान

- **दिवस 3 (25 सप्टेंबर) सकाळी अंगकोर वाट मंदिर, टोनले सॅप**

  सकाळी 5:30 वाजता प्रस्थान - अंगकोर वाट मंदिर, संध्या. 5:00 वाजता हॉटेलकडे परत भारतीय ज्ञानपरंपरा व्याख्यान

- **दिवस 4 (26 सप्टेंबर) कबाल स्पियान, सहस्त्र लिंग, बांटी श्री, प्रा रूप**

  सकाळी 7:30 वाजता प्रस्थान - संध्याकाळी 5:00 वाजता हॉटेलवर परत, 6 वाजता - सोनाली कुलकर्णी परफॉर्मन्स

- **दिवस 5 (27 सप्टेंबर) प्रीह खा, बांती कडाई, स्रा स्रांग आणि शॉपिंग, पब स्ट्रीट, नाईट मार्केट**

  सकाळी 7:30 वाजता प्रस्थान, दुपारी 2 वाजता हॉटेलवर परत, 4 नंतर खरेदी, पब स्ट्रीट, नाईट मार्केट

- **दिवस 6 (28 सप्टेंबर) सकाळी 7.30-8.30 - नाश्ता आणि पॅक लंच आणि विमानतळाकडे प्रस्थान.**

**कंबोडिया टूर पॅकेज:**

- **भारतातून येणारे प्रवासी:** ₹75,000/- (सर्व खर्चासह) + GST+ विमानभाडे

**विदेशातून येणाऱ्यासाठी पॅकेज:** USD 1000/- + Visa

**नोंदणीच्या वेळी:** ₹ 50,000/- (USD 600) देय रक्कम अगोदर जमा करणे आवश्यक आहे.

मुंबई/दिल्ली ते सियाम रीप (थेट किंवा व्हाया) फ्लाइट तिकीट ₹30,000 ते ₹45,000/- (जाणे-येणे)असे आहे. तिकिटाचे दर बदलत राहतात. तुम्ही जितक्या लवकर बुक कराल तेवढा तुम्हाला कमी दर मिळू शकेल.

- तिकीट बुकिंगसाठी मदत उपलब्ध आहे. प्रवासाच्या एक दिवस आधी आणि एक दिवसानंतर हॉटेलमध्ये राहण्याची सुविधा अतिरिक्त शुल्कासह उपलब्ध आहे. सिंगल शेअरिंग रूम अतिरिक्त शुल्कासह उपलब्ध आहे.

**नोंदणी कशी करावी?** 1) खालील लिंकवर क्लिक करा. 2) तेथील सर्व माहिती नीट वाचून आणि समजून घ्या. 3)नोंदणी फॉर्म ऑनलाईन भरा. 4) सोबत आधार कार्ड,पासपोर्ट आणि फोटो ऑनलाईन जोडा. 5) ऑनलाईन ॲडव्हान्स Rs.50,000/- एवढे पेमेंट ट्रान्सफर करा. मर्यादित प्रवेश आहेत. शक्य तितक्या लवकर नोंदणी करा. ॲडव्हान्स रक्कम भरून नोंदणी केल्यावरच आपला प्रवेश नक्की होईल याची नोंद घ्या.

**ऑनलाईन नोंदणीसाठी: www.angkorbharat.org/cambodia22sept24**

- **बँक खात्यावर किंवा गुगल पे क्रमांकावर ही करता येईल. बँक खात्याची माहिती:**
- खात्याचे नाव: विश्व मंदिर फाउंडेशन (Vishwa Mandir Foundation)

खाते क्र. 60358923479 IFSC Code: MAHB0000003 बँक: बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना, पुणे शाखा

**ऑफलाइन नोंदणी :** पुणे येथील कार्यालयात फॉर्म भरून आणि इतर documents देऊन ही नोंदणी करता येईल. त्यावेळी रोख रक्कम किंवा चेक द्वारेही advance रक्कम भरता येईल.

**विदेशातून सहभागी होणाऱ्यांसाठी सूचना:**

1) 23 सप्टेंबर रोजी दुपारी 12 वाजण्यापूर्वी सियाम रिप विमानतळावर पोहोचणे आवश्यक आहे.

2) कोणत्याही फ्लाइटची परतीची तिकिटे 28 सप्टेंबर 2024 या दिवशीची काढावीत.

**टूरमध्ये खालील गोष्टी समाविष्ट आहेत:**

1) सियाम रीप मधील 5 रात्री 4 स्टार हॉटेल निवास, ट्विन शेअरिंग रूम

२) विमान प्रवासाव्यतिरिक्त भारतीय नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण हॉटेलमध्येच मिळेल.

३) ई- व्हिसा शुल्क आणि ब्रोशरमध्ये नमूद केलेले सर्व टूर आणि मंदिर भेटी प्रवेश शुल्कासह समाविष्ट आहेत.

4) अप्सरा नृत्य, टोनले सॅप शुल्क समाविष्ट आहे.

5) प्रत्येकाला ट्रॅव्हल सिम कार्ड कॉलिंग डेटा मिळेल. त्यामुळे संपूर्ण टूर दरम्यान व्हॉटसअप कॉलिंग करता येईल.

6) प्रवासादरम्यान प्रति व्यक्ती एक बाटली पाण्याची व्यवस्था केली जाईल

7) ड्रायव्हर, असिस्टंट इत्यादींना दिलेल्या टिप्स 8) गाईड फी

**टूरमध्ये समाविष्ट नसलेल्या गोष्टी :**

1) वैयक्तिक खर्च जसे की खरेदी, वैद्यकीय आणि इतर खर्च 2) सर्व पेये आणि जेवण दरम्यान पॅक केलेले पाणी

3) प्रवास विमा 4) वर नमूद केलेले इतर खर्च

**प्रवासात जवळ बाळगाव्यात अशा आवश्यक गोष्टी:** गुडघा कॉम्प्स, ऍक्लेम पेन किलर क्रीम, तुमची रोजची औषधे इ.

**ट्रिप रद्द करण्याचे धोरण (Cancellation Policy)**

1) किमान ट्रिप रद्द करण्याचे शुल्क ₹35,000/-

2) 40 दिवसांपूर्वी रद्दीकरण शुल्क – ₹40.000/-

3) 20 दिवस अगोदर रद्द करण्याचे शुल्क रु 50,000/- आहे, त्यानंतर ट्रिप रद्द करता येणार नाही.

**टीप:** 1) कंबोडियामध्ये हॉटेल चेक आउटची वेळ सकाळी 10:00 आहे आणि चेक इनची वेळ सकाळी 11:00 ते दुपारी 12:00 आहे.

२) काही अपरिहार्य कारणास्तव प्रवास कार्यक्रमात बदल होऊ शकतो.

3) कार्यक्षेत्र मर्यादा: कोणत्याही न्यायालयीन तक्रारीसाठी कार्यक्षेत्र मर्यादा ही पुणे शहराची न्यायालयिन कार्यक्षेत्र ही मर्यादा असेल.

## अंगकोर भारत फाउंडेशन द्वारा विश्व मंदिर परिषद

**एक करोड भारतीय हिंदूंना अंगकोरवाट विष्णूधाम दर्शन घडविण्याचा दैवी संकल्प...**

अंगकोर टूर ही एक अनोखी अनुभुती आहे. UNESCO ने कंबोडियातील अंगकोरवाट आणि इतर मंदिर वास्तुकला यांनाही जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे. अंगकोर वाट सोबतच अंगकोर थॉम, बायोन, प्रीह विहर, बांटी श्री, ता-प्रोम, प्रा-रुप, बाखेंग इत्यादी मंदिर वास्तुकला देखील प्रसिद्ध आहेत. कंबोडियामध्ये सर्वत्र आपल्याला प्राचीन भारतीय संस्कृतीचे अभूतपूर्व आविष्कार पाहायला मिळतात. दरवर्षी जगभरातून 50 ते 60 लाख लोक अंगकोर वाटला भेट देतात. पण 5 हजारही हिंदू किंवा भारतीय जात नाहीत. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. अंगकोर भारत फाउंडेशनची स्थापना याच कारणासाठी करण्यात आली. आम्ही एक कोटी हिंदू भारतीयांना अंगकोर वाटला घेऊन जाण्याचा संकल्प केला आहे. कंबोडिया हा प्राचीन भारतीय अखंड भारताच्या कंबुज देशाचा सांस्कृतिक भाग होता. लाखो हिंदू भारतीय जेव्हा अंगकोर वाटला भेट देतील तेव्हा त्यांना प्राचीन भारतीयांची अद्भुत कल्पकता, धैर्य आणि आविष्कार यांची माहिती होईल. आपल्या देश आणि संस्कृतीबद्दल त्यांचा आदर वाढेल. त्यांचा आत्मविश्वास वाढेल.आपणा सर्वांना विनंती आहे की अंगकोर भारत फाउंडेशनमध्ये सामील व्हा आणि या देवी संकल्पामध्ये सहभागी व्हा. अंगकोर भारत फाउंडेशनचे मुख्य कार्यालय पुणे, भारत येथे आहे. अमेरिका आणि कंबोडियामध्ये तिच्या शाखा आहेत.

**अंगकोर भारत फाउंडेशन द्वारा विश्व मंदिर परिषद**

622, जानकी रघुनाथ, पुलाचीवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे, महाराष्ट्र - 04

मोबाईल : 8149471691 व्हॉट्सअप : 8421771262